संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# सत्यसंकल्पाचे वरदान 'प्रभू श्रीराम'

आरामः कल्पवृक्षाणां विरामः सकला पदाम्।
अभिरामः श्रीलोकानां रामः श्रीराम् स नः प्रभुः।

**कल्पवृक्षाप्रमाणे** असलेला प्रभुराम सगळी संकटे दूर करणारा, लोकांना आवडणारा असा हा श्रीराम आमचा प्रभू आहे. असा या श्लोकाचा अर्थ होतो. रामरक्षेच्या नित्य पठणातून देशात अनेक घरोघरी रामाची आराधना केली जाते. प्रत्यक्ष शिवशंकरांनी बुधकौशिक ऋषींच्या स्वप्नात येऊन श्रीरामरक्षेचे कवच प्रदान केले होते. आणि ते आज हजारो वर्षानंतरही घरोघरी तितक्याच भक्तीभावाने किंबहुना आर्ततेने गायले जाते, म्हटले जाते. आज रामनवमीच्या निमित्ताने संपूर्ण भारतभूमी राममय झाली आहे. अयोध्येपासून ते तामिळनाडूतल्या रामेश्वरपर्यंत किंवा नाशिकच्या पंचवटीपर्यंत ज्या ज्या ठिकाणी प्रभुरामचंद्रांचा पदस्पर्श झाला अशा ठिकाणी मोठे उत्सव साजरे होतात. आणि राम या दोन अक्षरातला हजारो वर्षापासूनच्या चमत्काराची अनुभूती घेतली जाते. राम या शब्दामध्ये दडलेली शक्ती किती विलक्षण स्वरुपाची आहे हा अनुभव प्रत्येक व्यक्ती आपल्या मनाने आणि हृदयाने घेत असते. रामनामाचा उद्घोष करताना मनाला मिळणारा आनंद भक्तीसंस्कारांचा ओलावा किंबहुना श्रीराम जयराम जयजयराम या जपामधून आपले संपूर्ण आयुष्य सार्थकी लावण्याचा प्राप्त होणारा पुण्यमय दिलासा या गोष्टींची कशाशीही तुलना होऊ शकत नाही. मनुष्य जन्माला आल्यानंतर ज्याने रामनाम घेतले नाही त्याने आपल्या आयुष्याला ओळखलेलेच नाही असा त्याचा अर्थ होतो. केवळ शरीराचे पोषण करणे, गडगंज पैसा कमावणे, संसार प्रपंच करून मुलं बाळं जन्माला घालणे किंवा त्यांचीही लग्नकार्ये करून नातवंडांना खेळवण्याचा आनंद म्हणजे आयुष्य नाही. तर या सगळ्या आनंदाला परमानंदाचे सुरक्षा कवच हवे असते. आणि ते सुरक्षा कवच रामनामाच्या माध्यमातून प्राप्त होते. हे अनेकवेळेला सिध्द झालेले आहे की प्रत्यक्ष राम असताना काही थोड्या लोकांचाच उध्दार झाला परंतु आज केवळ रामनामाने लाखो भक्तांच्या जीवनाचा उध्दार झालेला पाहायला मिळतो. केवळ राम या शब्दातील ही ताकद ही गोष्ट रामाला शरण जाऊनच समजून घ्यावी लागते. भौतिक सुखासाठी रामनाम नाही तर ते मनुष्यजन्माच्या उन्नतीकरीता मिळालेले वरदान आहे हे लक्षात घ्यावे लागेल,

### भारतीय समाजमन आणि राम

भारतीय संस्कृतीत झालेल्या अनेक अवतारांमध्ये राम आणि कृष्ण या दोन अवतारांनी अवघे समाजमन व्यापलेले आहे. प्रभू रामचंद्रांच्या जीवनचरित्राचे वैशिष्ट्य असे की त्यांनी मनुष्याच्या जीवनव्यवहाराचे आदर्श निर्माण केले. आणि कर्तव्याला जागण्याकरीता कोणत्या प्रकारची सिध्दता ठेवावी लागते याचेही उदाहरण घालून दिले. आज आपण राम या शब्दातील शक्ती जेव्हा मान्य करतो त्यावेळेला प्रत्यक्ष रामाने आपल्या जीवनामध्ये जे जे शब्द उच्चारले ते पाळण्याचा आणि ते शब्द सत्यात उतरवून दाखवण्याची किमया रामाने केलेली आपल्याला पाहायला मिळते. मग आपले वडील दशरथांना दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी पत्करलेला वनवास असेल किंवा तब्बल ८० वर्षे आपल्या प्रतिक्षेत आणि सेवेत रमलेल्या शबरीच्या झोपडीत तिची उष्टी बोरे खाण्याचा रामाने केलेला संस्कार असेल. या सर्व गोष्टी त्याच्यामधल्या उदारतेची आणि उदात्ततेची साक्ष देणाऱ्या ठरतात. लक्ष्मण भरतासारखे भाऊ मिळाले परंतु त्यांच्यातल्या देवत्वाला ओळखण्याचे काम रामांनी केले आहे. भरताला तूच राज्य कर म्हणून सांगणारा प्रभू राम आणि लक्ष्मणाच्या रुपात आपल्यावर झालेली ईश्वरी कृपा मानणारा राम ही रामाची उदात्तता आहे. रामराज्यासाठी सीतेचा जरी त्याग केला असला तरीसुध्दा सीतेसाठी रावणाचा सर्वनाश करणारा राम अशी दोन वेगळी परंतु अतिशय संवेदनशील कारूण्यरुपे रामामधून पाहायला मिळतात. आपण नेहमी रामाला मर्यादापुरुषोत्तम म्हणतो. कारण त्याने आपल्या आयुष्यात पाळलेल्या मर्यादा सामान्य माणसाला आचरणात आणणे कदापी शक्य होणारे नाही.परंतु सर्वांवरच करूणेची पखरण करणाऱ्या रामाने आपल्यालाही सत्प्रवृत्तीचे दान द्यावे आणि मनामधल्या सत्य संकल्पांचा दाता त्याने व्हावे अशी आर्तता एवढ्याचसाठी रामभक्त व्यक्त करीत असतात. दुष्टांच्या निर्दालनासाठी राम किंवा कृष्णाचे अवतार झाले असे आपण मानतो आजच्या कलियुगामध्ये दुष्टप्रवृत्तींचा नाश करण्याकरीता प्रत्येकानेच आपल्या मनातील राम जागवला तर आपोआपच दुष्ट विचारांचे किंवा वाईट विचारांचे निर्दालन होऊ शकेल अशा मनातील सत्यसंकल्पांचे दान पूर्ण करण्यासाठीच रामनामाचे वरदान आहे.

### गीतरामायणाची किमया

राम किंवा रामायण म्हटल्यानंतर वाल्मिकी, तुलसीदास यांची हमखासपणे आठवण होते. परंतु त्याच वाल्मिकींच्या तोडीचे गीतरामायण लिहीणारे ग.दि.माडगुळकर हे मराठीतले वाल्मिकी आहेत असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. सध्या त्यांची शताब्दी सुरु आहे. त्यांनी लिहीलेल्या आणि सुधीर फडकेंनी आपल्या स्वरतीर्थाने अमर केलेल्या गीतरामायणाची आठवण होणे अनिवार्य ठरते. खरे तर चैत्रप्रतिपदा किंवा पाडवा आला की ग.दि मांच्या गीतरामायणाचा मंगलध्वनी घराघरामध्ये घुमू लागतो. अयोध्येतला राम प्रत्येक मनाला अवैध्य बनवून एका मनस्वी शांततेचा अनुभव देत राहातो. अशा या राम आणि रामायणाच्या पारायणाने जीवनाचे आवर्तन पूर्ण करण्याची अभिलाषा निर्माण होणे स्वाभाविक ठरते. आजच्या पिढीला प्रभूरामांचे किंवा एकूणच देवभक्तीचे वावडे दिसून येते. भौतिक सुखाची लयलूट सुरु असल्याने खऱ्या सुखासमाधानाची अनुभूती ते घेऊ शकत नाहीत. परंतु घराघरामधून जर या रामनामाचा संस्कार जर नीट गोंदवला गेला तर आज सामाजिक स्तरावर दिसून येणारी अस्वस्थता नाहीशी होऊ शकते. कारण राम किंवा रामायण हा केवळ भक्तीचा प्रकार नाही. तर प्रत्यक्ष कृतीमधून आत्मशक्ती जागवण्याची एक विलक्षण किमया ठरते. रामायणातील अनेक चरित्रे हे खूप मोठे संस्कार घडवणारे आहेत. याची रामालासुध्दा जाणीव असावी म्हणूनच हनुमंत आपला दास जरी असला तरी रोज त्याचे स्मरण केल्याशिवाय आपल्याला चैन पडत नसल्याची कबुली याच रामचरित्रातून आपल्याला वाचायला मिळते. म्हणूनच राम हे एका दिगंत कीर्तीचे सर्वात मोठे आश्वासन ठरते.